॥ श्री नवनाथभक्तिसार ॥

Shri Navnath Bhaktisar

ADHYAYA 9 --- NAVAADHYAYA

श्रीगणेशाय नमः । श्रीगुरुभ्यो नमः । श्रीपांडुरंगाय नमः । श्रीकुलदेवतायै नमः । श्रीमातापितृभ्यां नमः ।

Shri Ganeshaaya Namah | Shri Gurubhyo Namah | Shri Paandurangaaya Namah | Shri Kuladevataayai Namah | Shri Maataa pitribhyaam Namah |

Summary

Having received Shri Rama's blessing in the previous chapter, Machchindranath sets out on pilgrimage. He journeys through the seven sacred cities of liberation before arriving in Bengal to fulfill an old promise. Returning to the house of the Brahmin couple, he learns that Saraswati succumbed to doubt and discarded the sacred ash into a dung heap twelve years prior. Suppressing his bitter disappointment, the master approaches the mound and calls forth the divine child, naming him Goraksha. The boy emerges from the earth radiant as the sun, bearing the cosmos within his form. After sending the weeping mother away, Machchindranath initiates the young disciple into the Nath path and travels toward Jagannath. When hunger strikes the master at Kanakgiri, Goraksha seeks alms from a local feast, where the hostess serves a magnificent meal. Wanting to satisfy his Guru's lingering desire for a final delicacy, Goraksha returns to the house, but the skeptical woman demands his very eyeball as the price. Without a moment's hesitation, the boy plucks out his eye to serve his master. Upon discovering this ultimate sacrifice, a deeply moved Machchindranath uses the powerful Mantra-Sanjivani to restore Goraksha's sight before granting him the full treasury of celestial weapons and spiritual knowledge.

Ovee 1

जयजयाजी जगदुद्वारा । अवतारदीक्षाज्ञानेश्वरा । अघटितमायावतारधरा । भिंतीवाहना गुरुराया ॥ १ ॥

Transliteration

Jayajayaajee Jagad-udvaaraa | Avataara-deekshaa-Jnaaneshvaraa | Aghatita-maayaa-vataara-dharaa | Bhintee-vaahanaa Guru-raayaa ||

Ovee 2

रेडयामुखीं वेदोच्चार । करुनि तोषविले सकळ विप्र । फोडोनि भगवदगीताभांडार । सकळ जनां वाढिलें ॥ २ ॥

Transliteration

Redyaa-mukheen Vedo-chchaaru | Karuni toshavile sakala Vipru | Phodoni Bhagavad-geetaa-bhaandaaru | Sakala janaa vaadhile ||

Ovee 3

ऐसा तूं कविमहाराज । तरी मम कामनेचें धरुनि चोज । ग्रंथार्थी विपुल सुरस । वैखरीतें वदवीं कां ॥ ३ ॥

Transliteration

Aisaa too Kavi-mahaaraaju | Taree mama kaamanechen dharuni choju | Granthaarthee vipula surasu | Vaikhareete vadavee kaa ||

Ovee 4

मागिले अध्यायीं कथा सुरस । दिधली भाक मच्छिंद्रास । वर देऊनि वातचक्रास । गमन करिता पैं झाला ॥ ४ ॥

Transliteration

Maagile adhyaayee kathaa surasu | Didhalee bhaaka Machchindraasu | Vara deuuni Vaata-chakraasu | Gamana karitaa pai jhaalaa ||

Ovee 5

आणि श्रीरामाची झाली भेटी । तेणेंही वर ओपूनि शेवटीं । पाशुपतरायाची रामाचे पोटीं । कामना संतुष्ट केली मच्छिंद्र ॥ ५ ॥

Transliteration

Aani Shree-Raamaachee jhaalee bhetee | Tenenhee vara opooni shevatee | Paashupata-raayaachee Raamaache potee | Kaamanaa santushta kelee Machchindru ||

Ovee 6

असो आतां येथूनि मच्छिंद्रनाथ । सप्त मोक्षपुऱ्या पाहूनि त्वरित । अयोध्या मथुरा अवंतिका यथार्थ । काशी काश्मिरी पाहिलीं ॥ ६ ॥

Transliteration

Aso aataa yethooni Machchindra-Naathu | Sapta Moksha-purya paahuuni tvaritu | Ayodhyaa Mathuraa Avantikaa yathaarthu | Kaashee Kaashmiree paahilee ||

Ovee 7

मिथिला प्रयाग गया सुग्ग । तेथें नमूनि विष्णुपदास । अन्य तीर्थे करुनि बंगालदेश । चंद्रागिरीस तो पातला ॥ ७ ॥

Transliteration

Mithilaa Prayaaga Gayaa surasu (sugga) | Tethe namooni Vishnu-padaasu | Anya teerthe karuni Bangaala-deshu | Chandraagireesa toh paatalaa ||

Ovee 8

गांवांत करितां भिक्षाटन । तों सर्वोपकारी दयाळू ब्राह्मण । तयाचे दृष्टी पडतां सदन । झालें स्मरण भस्माचें ॥ ८ ॥

Transliteration

Gaavaanta karitaa bhikshaatanu | Toh sarvopakaaree dayaalu Braahmanu | Tayaache drishtee padataa sadanu | Jhaale smarana bhasmaachen ||

Ovee 9

मनांत म्हणे याच सदनीं । पुत्रमंत्रसंजीवनी । वरदभस्मी सिद्ध करुनी । दिधली होती निश्चयें ॥ ९ ॥

Transliteration

Manaanta mhane yaacha sadanee | Putra-mantra-sanjeevanee | Varada-bhasmee siddha karunee | Didhalee hotee nishchayen ||

Ovee 10

तरी ती साध्वी विप्रजाया । सरस्वती नामें होती जया । सर्वोपकारी दयाळ द्विजभार्या । सुकृत होतें तियेचें ॥ १० ॥

Transliteration

Taree tee saadhvee Vipra-jaayaa | Sarasvatee naamen hotee jayaa | Sarvopakaaree dayaala Dvija-bhaaryaa | Sukruta hoten tiyechen ||

Ovee 11

तरी द्वादश वर्षे लोटल्यापाठीं । पुन्हां मी येईन शेवटीं । ऐसें वदोनि भस्मचिमुटी । सरस्वतीतें दीधली असे ॥ ११ ॥

Transliteration

Taree dvaadasha varshe lotalyaa-paathee | Punhaa mee yaeena shevatee | Aise vadoni bhasma-chimutee | Sarasvateete de deedhalee ase ||

Ovee 12

तरी त्या मायेचा शोध करुन । पाहूं तियेचा वरदनंदन । ऐसें हदयीं मच्छिंद्र आणून । सदनामाजी प्रवेशला ॥ १२ ॥

Transliteration

Taree tyaa maayechaa shodha karunu | Paahoo tiyechaa Varada-nandanu | Aise hrudayee Machchindra aanuunu | Sadanaa-maajee praveshalaa ||

Ovee 13

उभा राहूनि विप्रांगणीं । हे सरस्वति ऐसी पुकारी वाणी । तंव ती ऐकूनि शुभाननी । बाहेर आली अति त्वरें ॥ १३ ॥

Transliteration

Ubhaa raahuuni Vipra-anganee | Hey Sarasvati aisee pukaaree vaanee | Tava tee aikuuni Shubhaananee | Baahera aalee ati tvaren ||

Ovee 14

येतां देखिला योगद्रुम । मग भिक्षा घेऊनी उत्तमोत्तम । म्हणे महाराजा भिक्षान्न । झोळीमाजी स्वीकारीं ॥ १४ ॥

Transliteration

Yetaa dekhila Yoga-drumu | Maga bhikshaa gheuunee uttamottamu | Mhane Mahaaraajaa bhikshaannu | Jholee-maajee sveekaaree ||

Ovee 15

मच्छिंद्र म्हणे वो शोभननी । तव नाम काय तें ऐकूं दे कानीं । येरी म्हणे सरस्वती अभिधानी । लोकोपचारें मज असे ॥ १५ ॥

Transliteration

Machchindra mhane vo Shobhananee | Tava naama kaaya tey aikoo de kaanee | Yeree mhane Sarasvatee abhidhaanee | Lokopachaaren maja ase ||

Ovee 16

उपरी मच्छिंद्र बोले तीतें । नाम काय तव भ्रतागतें । येरी म्हणे सर्व त्यातें । दयाळपती म्हणताती ॥ १६ ॥

Transliteration

Upari Machchindra bole teete | Naama kaaya tava bhrataagate | Yeree mhane sarva tyaate | Dayaala-patee mhanataatee ||

Ovee 17

नाथ म्हणे तुम्ही कवण जाती । गौड विप्र म्हणे ती तैं सरस्वती । ऐसें ऐकूनि खूण चित्तीं । मिळाली तेव्हां नाथाच्या ॥ १७ ॥

Transliteration

Naatha mhane tumhee kavana jaatee | Gauda Vipra mhane tee tai Sarasvatee | Aise aikuuni khoona chittee | Milalee tevhaa Naathaachyaa ||

Ovee 18

मच्छिंद्र म्हणे माये ऐक । दावीं कोठे तव बाळक । येरी म्हणे जी पुत्रमुख । पाहिले नाहीं अद्यापि ॥ १८ ॥

Transliteration

Machchindra mhane maaye aiku | Daavee kothe tava baalaku | Yeree mhane jee putra-mukhu | Paahile naahee adyaapi ||

Ovee 19

मच्छिंद्र म्हणे बोलसी कां खोटें । म्यां वरदभस्माचीं दिधली चिमुट । भस्म नोहे तें संजीवनीपीठ । पुत्ररुपींचें दर्शवी ॥ १९ ॥

Transliteration

Machchindra mhane bolasee kaa khote | Myaa Varada-bhasmaacheen didhalee chimutu | Bhasma nohe tey Sanjeevanee-peethu | Putra-rupeenchen darshavee ||

Ovee 20

दाखवी परी तो पुत्र कैसा । अजरामर मागें सोडिला कैसा । तेजःपुंज अन्यून अनिळ महेशा । ऐसा पुत्र असेल कीं ॥ २० ॥

Transliteration

Daakhavee paree toh putra kaisaa | Ajaraamara maage sodilaa kaisaa | Teja-punja anyoona Anila Maheshaa | Aisaa putra asela kee ||

Ovee 21

असो भस्मचिमुटी ऐकतां वाणी । खूणयुक्त झाली नितंबिनी । परी भस्मचिमुटीतें उकिरडाभुवनीं । सांडिले अन्याय वाढला ॥ २१ ॥

Transliteration

Aso bhasma-chimutee aikataa vaanee | Khoona-yukta jhaalee nitambinee | Paree bhasma-chimutee tey ukiradaa-bhuvanee | Saandile anyaaya vaadhalaa ||

Ovee 22

तेणेंकरुनि जाहली भयग्रस्त । हदयीं संचरला कंपवात । चित्तीं म्हणे आतां हा नाथ । शिक्षा करील मजलागीं ॥ २२ ॥

Transliteration

Tenen-karuni jaahalee bhaya-grastu | Hrudayee sancharalaa kampa-vaatu | Chittee mhane aataa haa Naathu | Shikshaa kareela maja-laagee ||

Ovee 23

नेणों शापें करील भस्म । कीं तोडील स्वशक्तीनें माझा काम । कीं तरुरुप हो ऐसा शाप देऊन । सांडूनि जाईल अवनीतें ॥ २३ ॥

Transliteration

Neno shaapen kareela bhasmu | Kee todeela sva-shakteenen maajhaa kaamu | Kee taru-roopa ho aisaa shaapa deuunu | Saandooni jaaeela avaneete ||

Ovee 24

आधी मी अल्पबुद्धीपासुनी । घेतल्या आहेत नितंबिनीवाणी । कीं कानफाटयाची विपरीत करणी । अविद्यार्णवी असती ते ॥ २४ ॥

Transliteration

Aadhee mee alpa-buddhee-paasooni | Ghetalyaa aahate nitambinee-vaanee | Kee Kaanaphaatyaachee vipareeta karanee | Avidyaa-arnavee asatee tey ||

Ovee 25

नाटक चेटक कुडे अपार कपट । जाणती दुर्गुण परम पापिष्ट । जाया पाहूनि उत्तम बरवट । स्तुती करिती तियेची ॥ २५ ॥

Transliteration

Naataka chetaka kude apaara kapatu | Jaanatee durguna parama paapishtu | Jaayaa paahuuni uttama baravatu | Stutee karitee tiyeechee ||

Ovee 26

दिनमानपर्यंत कुत्री । उत्तम जया करिती रात्रीं । मग शयनीं घेऊनि शेजपात्रीं । भोग भोगिती दुरात्मे ॥ २६ ॥

Transliteration

Dinamaana-paryanta kutree | Uttama jayaa karitee raatree | Maga shayanee gheuuni sheja-paatree | Bhoga bhogitee duraatme ||

Ovee 27

ऐसें पूर्वी मज श्रुत । सखियामुखीं श्रवण केलें होतें । परी तोचि बोल समस्त । सत्य होऊं पाहतसे ॥ २७ ॥

Transliteration

Aise poorvee maja shrutu | Sakhiyaa-mukheen shravana kele hote | Paree tochi bola samastu | Satya hooo paahatase ||

Ovee 28

तरी आतां कपाळ फुटकें । होणार ते होऊ शके । कानफाटया करुनि चेटकें । दशा करील कीं माझी ॥ २८ ॥

Transliteration

Taree aataa kapaala phutake | Honara tey hooo shake | Kaanaphaatyaa karuni chetake | Dashaa kareela kee maajhee ||

Ovee 29

तरी यातें कवण उपाय । कांहीं सुचेना करुं काय । हा ओळख धरुनि समय । साधूनि आला परतोनि ॥ २९ ॥

Transliteration

Taree yaate kavana upaayu | Kaanhee suchenaa karoo kaaya | Haa olakha dharuni samayu | Saadhooni aalaa paratoni ||

Ovee 30

ऐसे रीतीं मनीं जल्पत । तरी गात्रें थरथरा कापत । अत्यंत भयाचें भरुनि भरतें । शुद्धि पात्रा सोडिलें तिनें ॥ ३० ॥

Transliteration

Aise reeteen manee jalpatu | Taree gaatre tharatharaa kaapatu | Atyanta bhayaachen bharuni bharate | Shuddhi paatraa sodile tinen ||

Ovee 31

यावरी नाथ म्हणे वो जननी । पाहसी काय तूं पिशाचपणीं । पुत्र कोठें तो दावी नयनी । उशीर न लावीं वो माते ॥ ३१ ॥

Transliteration

Yaavaree Naatha mhane vo Jananee | Paahasee kaaya too pishaacha-panee | Putra kothe toh daavee nayanee | Usheera na laavee vo Maate ||

Ovee 32

ऐसिया बोलाची होतां दाटी । मग विचारी हृदयी गोरटी । कीं यासी वदावी खरी गोष्टी । वृत्तांत जितुका झाला तो ॥ ३२ ॥

Transliteration

Aisiyaa bolaachee hotaa daatee | Maga vichaaree hrudayee goratee | Kee yaasee vadaavee kharee goshtee | Vrittaanta jitukaa jhaalaa toh ||

Ovee 33

खरेपणीं आहे वर्म । मिथ्यावादी होय न शर्म । दैवें अन्यायसाफी होऊन । मुक्त होतसे तो प्राणी ॥ ३३ ॥

Transliteration

Khare-panee aahe varmu | Mithyaa-vaadee hoya na sharmu | Daiven anyaaya-saafee houunu | Mukta hotase toh praanee ||

Ovee 34

तस्मात् जी खरी सत्यनीती । त्यांत साहते बहु असती । पांचांमुखीं बदूनि श्रीपती । मुक्त करी अन्यायीं ॥ ३४ ॥

Transliteration

Tasmaat jee kharee satya-neete | Tyaata saahate bahu asatee | Paanchaa-mukheen baduni Shree-patee | Mukta karee anyaayee ||

Ovee 35

तस्मात् राहो अथवा जावो प्राण । पुढें येवो कैसें घडून । परी सत्य वाचे खरें भाषण । वृत्तांत झाला तैसा वदूं ॥ ३५ ॥

Transliteration

Tasmaat raaho athavaa jaavo praanu | Pudhe yevo kaise ghadunu | Paree satya vaache khare bhaashanu | Vrittaanta jhaalaa taisaa vadu ||

Ovee 36

मग चरणीं ठेवूनि भाळ । उभय जोडूनि करकमळ । म्लानमुख दीन विकळ । वृत्तांत सकळ निरोपी ॥ ३६ ॥

Transliteration

Maga charanee thevuuni bhaalu | Ubhaya jodooni kara-kamalu | Mlaana-mukha deena vikalu | Vrittaanta sakala niropee ||

Ovee 37

म्हणे महाराजा क्षमाशीळा । आपण जो कां प्रसाद दिधला । परी अन्याय मजपासूनि झला । भस्म गारी सांडिलें ॥ ३७ ॥

Transliteration

Mhane Mahaaraajaa Kshamaa-sheelaa | Aapana jo kaa prasaada didhalaa | Paree anyaaya maja-paasooni jhalaa | Bhasma gaaree saandile ||

Ovee 38

सांडिलें म्हणाल काय म्हणून । तरी विश्वासें व्यापिलें नव्हतें मन । भस्मानें पुत्र होईल कोठून । ऐसे म्हणून सांडिले ॥ ३८ ॥

Transliteration

Saandile mhanal kaaya mhanunu | Taree vishvaasen vyaapile navate manu | Bhasmaanen putra hoeela kothoonu | Aise mhanunu saandile ||

Ovee 39

शेजारी असती बोलती जन । दारा म्हणती प्रज्ञावान । खरें नाहे निरुपण । केले विचित्र तुजलागी ॥ ३९ ॥

Transliteration

Shejaaree asatee bolatee janu | Daaraa mhanatee prajnaa-vaanu | Khare naahe nirupanu | Kele vichitra tujalaagee ||

Ovee 40

तेणें संशय आणूनि मनीं । नेणों कैसी घडेल करणी । जठरीं पेटला कोपवन्ही । तरी आपणचि भोगावा ॥ ४० ॥

Transliteration

Tenen samshaya aanuuni manee | Neno kaisee ghadela karanee | Jatharee petalaa kopa-vanhee | Taree aapanachi bhogaavaa ||

Ovee 41

अपत्याकरितां परम अहित । परगृहीं मिरवावें कां यथार्थ । म्हणोनि गौप्य धरिलें चित्तांत । समस्ती बदलीसे ॥ ४१ ॥

Transliteration

Apatyaa-karitaa parama ahitu | Para-gruheen miravaave kaa yathaarthu | Mhanoni gaupya dharile chittaatu | Samastee badaleese ||

Ovee 42

जन्मांत आल्या परोपकार । करावा हें शास्त्रनिर्धारं । न घडेल तरी उपकार । अनुपकार करुं नये ॥ ४२ ॥

Transliteration

Janmaanta aalyaa para-upakaaru | Karaavaa hey shaastra-nirdhaaru | Na ghadela taree upakaaru | Anupakaara karoo naye ||

Ovee 43

उत्तम वृक्षाची करावी लावणी । न धडे तरी न टाकावा खंडुनी । धर्म करावा न मेदिनीं । वारुं नये कवणातें ॥ ४३ ॥

Transliteration

Uttama vrikshaachee karaavee laavanee | Na dhade taree na taakaavaa khandunee | Dharma karaavaa na medinee | Vaaroo naye kavanaate ||

Ovee 44

आपण स्वतां तीर्थासी जावें । न घडे तरी परा न वारावें । विवाहकार्य कदा न मोडावें । आपुली बुद्धी वेंचुनियां ॥ ४४ ॥

Transliteration

Aapana svataa ha teerthaasee jaave | Na ghade taree paraa na vaaraave | Vivaaha-kaarya kadaa na modaave | Aapulee buddhee venchuniyaa ||

Ovee 45

गौतमीं करुं जातां चोरी । तेथें वेचूं नये वैखरी । तस्करातें मारितां अधिकारी । आड त्यातें होऊं नये ॥ ४५ ॥

Transliteration

Gautameen karoo jaataa choree | Tethe vechoo naye vaikharee | Taskaraate maareetaa adhikaaree | Aada tyaate hooo naye ||

Ovee 46

सुतापाशी पित्याचे अवगुण । सांगूनि न करावें मन क्षीण । सुनेपाशीं सासू हीन । म्हणूं नये कदाचि ॥ ४६ ॥

Transliteration

Sutaa-paashee pityaache avagunu | Saanguuni na karaave mana ksheenu | Sune-paashee saasoo heenu | Mhanuu naye kadaachi ||

Ovee 47

कूप तडाग मळे बागाईत । करतां वारुं नये कवणातें । कोणी कीर्तनासी असतील जात । आड येऊं नयें त्यासी ॥ ४७ ॥

Transliteration

Koopa tadaaga male baagaaitu | Karataa vaaroo naye kavanaate | Konee keertanaasee asateela jaatu | Aada yeoo nayen tyaasee ||

Ovee 48

आपुली वैखरी वेचल्यांत । होऊं पाहे पराचे अनहित । तरी ते विचारुनि स्वचित्तांत । मौनें कांहीं न बोलावें ॥ ४८ ॥

Transliteration

Aapulee vaikharee vechalyaata | Hooo paahe paraache anahitu | Taree tey vichaaruni sva-chittaata | Maunen kaanhee na bolaave ||

Ovee 49

ऐसें जाणोनि सरस्वती । सत्य बोलली ती युवती । कीं महाराजा विश्वास चित्तीं । ठसला नव्हता त्या वेळे ॥ ४९ ॥

Transliteration

Aise jaanoni Sarasvatee | Satya bolalee tee yuvatee | Kee Mahaaraajaa vishvaasa chittee | Thasalaa navhataa tyaa vele ||

Ovee 50

ऐसिया युक्तीप्रयुक्तीकरुन । भावाभावी दृष्टी वेंचून । जेणें जनाचें होय कल्याण । तोचि अर्थ करावा ॥ ५० ॥

Transliteration

Aisiyaa yuktee-prayuktee-karunu | Bhaavaa-bhaavee drishtee venchuunu | Jenen janaachen hoya kalyaanu | Tochi artha karaavaa ||

Ovee 51

म्हणूनि भस्माचे सांडवण । मज दयाळा घडलें पूर्ण । काय करुं दैवहीन । उपाय तो अपाय झालासे ॥ ५१ ॥

Transliteration

Mhanuni bhasmaache saandavanu | Maja dayaala ghadale poornu | Kaaya karoo daiva-heenu | Upaaya toh apaaya jhaalaase ||

Ovee 52

कीं वाटे चालतां चाली । धनाची ग्रंथिका पुढें आली । परी दैवहीना बुद्धी संचरली । अंध व्हावें तें समयीं ॥ ५२ ॥

Transliteration

Kee vaate chaalataa chaalee | Dhanaachee granthikaa pudhe aalee | Paree daiva-heenaa buddhee sancharalee | Andha vhaave tey samayee ||

Ovee 53

कीं कल्पतरुच्या वृक्षाखाली । कल्पिली कल्पना फळा आली । कीं पिशाचवत बुद्धी संचरली । दैवहीना शेवटीं ॥ ५३ ॥

Transliteration

Kee Kalpataru-chyaa vrikshaa-khaalee | Kalpilee kalpanaa phalaa aalee | Kee pishaacha-vata buddhee sancharalee | Daiva-heenaa shevatee ||

Ovee 54

तन्न्यायें मातें झालें । आतां क्षमा करावी माउले । अज्ञानापणें उडविलें । हित माझें महाराजा ॥ ५४ ॥

Transliteration

Tannyaayen maate jhaale | Aataa kshamaa karaavee maaule | Ajnaanaa-panen udavile | Hita maajhe Mahaaraajaa ||

Ovee 55

परी ही ऐकतां वाणी । मच्छिंद्र खिन्न झाला मनीं । म्हणे स्त्रिया जाती पापरुपिणी । अविश्वासाचें भांडार हें ॥ ५५ ॥

Transliteration

Paree hee aikataa vaanee | Machchindra khinna jhaalaa manee | Mhane striyaa jaatee paapa-rupinee | Avishvaasaachen bhaandaara hey ||

Ovee 56

हिताहित कदा न जाणती । भलतेसें पद ठेविती । आपण बुडूनि दुसऱ्यास बुडविती । बेचाळीस पूर्वजांसी ॥ ५६ ॥

Transliteration

Hitaahita kadaa na jaanatee | Bhalatesen pada thevitee | Aapana budooni dusaryaasa budavitee | Bechaaleesa poorvajaasee ||

Ovee 57

स्त्रियांसंगें लाभ किंचित । कांही दिसेना सकळ अनहित । उगाचि रावे भडाइत । वृषभ जेवीं वनीचा ॥ ५७ ॥

Transliteration

Striyaa-sangen laabha kincitu | Kaanhee disenaa sakala anahitu | Ugaachi raave bhadaaitu | Vrishabha jevee vaneechaa ||

Ovee 58

उदयापासूनि सायंकाळ । कष्ट अमित होती तुंबळ । एक क्षणही चित्त शीतळ । विश्रांतीतें मिळेना ॥ ५८ ॥

Transliteration

Udayaa-paasooni saayam-kaalu | Kashta amita hotee tumbalu | Eka kshanhee chitta sheetalu | Vishraantee-tey milenaa ||

Ovee 59

या विषयसुखाची परी । मानावी जरी हृदयांतरी । तेथें होय स्वशक्तिबोहरी । निर्बळपणी मिरवावें ॥ ५९ ॥

Transliteration

Yaa vishaya-sukhaachee paree | Maanaavee jaree hrudayaantaree | Tethe hoya sva-shakti-boharee | Nirbala-panee miravaave ||

Ovee 60

ऐसी जीवासी अवस्था होय । मेलिया नरकामाजी जाय । केल्या कर्माचे रुप फेडाया । आचरण कांहीं नसेचि ॥ ६० ॥

Transliteration

Aisee jeevaasee avasthaa hoyu | Meliyaa naraka-maajee jaayu | Kelyaa karmaache rupa phedaayaa | Aacharana kaanhee nasechi ||

Ovee 61

शिष्यपाप गुरुनाथा । स्त्रीपाप भोगणें भर्ता । तस्मात् जिकडे तिकडे पाहतां । अनर्थाचें मूळ ती ॥ ६१ ॥

Transliteration

Shishya-paapa Guru-naathaa | Stree-paapa bhogane bhartaa | Tasmaat jikade tikade paahataa | Anarthaachen moola tee ||

Ovee 62

तस्मात् स्त्रियांचे बुद्धी लागे जन । तो प्राणी गा प्रज्ञाहीन । महामूर्ख अति मलीण । दुष्कर्माचा भांडारी ॥ ६२ ॥

Transliteration

Tasmaat striyaanche buddhee laage janu | Toh praanee gaa prajnaa-heenu | Mahaa-moorkha ati maleenu | Dushkarmaachaa bhaandaaree ||

Ovee 63

तन्न्यायें मी मूर्ख झालों । या बाईच्या बोलीं लागलों । वरदमंत्रभस्य ओपिलों । सूर्यवीर्या आणोनी ॥ ६३ ॥

Transliteration

Tannyaayen mee moorkha jhaalo | Yaa baai-chyaa bolee laagalo | Varada-mantra-bhasya opilo | Soorya-veeryaa aanonee ||

Ovee 64

याउपरी आणीक वर । मंत्रसंजीवनी आहे अमर । सूर्यवीर्ये देहवर । रचिला असेल कोठेंही ॥ ६४ ॥

Transliteration

Yaa-uparee aaneeka varu | Mantra-sanjeevanee aahe amaru | Soorya-veerye deha-varu | Rachilaa asela kothehee ||

Ovee 65

तरी आतां ठाव सांडिला । शोध करुनि पाहूं वहिला । ऐसा मनीं विचार केला । सरस्वतीतें बोलतसे ॥ ६५ ॥

Transliteration

Taree aataa thaava saandilaa | Shodha karuni paahoo vahilaa | Aisaa manee vichaara kelaa | Sarasvatee tey bolatase ||

Ovee 66

म्हणे माय वो ऐक वचन । घडलें घडो दैवयोगानें । तरी सांडिलें भस्म तें ठिकाण । मम दृष्टीसी दावीं कां ॥ ६६ ॥

Transliteration

Mhane maaya vo aika vachanu | Ghadale ghado daiva-yogaanen | Taree saandile bhasma tey thikaanu | Mama drishtee-see daavee kaa ||

Ovee 67

तुजवरी क्षोभ करावा कांहीं । तरी पदरीं कांही पडत नाहीं । तरी सांडिला ठाव माझे आई । निजदृष्टीं दावी कां ॥ ६७ ॥

Transliteration

Tujavaree kshobha karaavaa kaanhee | Taree padaree kaanhee padata naahee | Taree saandilaa thaava maajhe Aai | Nija-drishteen daavee kaa ||

Ovee 68

ऐसे बोलतां नाथ वाणी । भय फिटलें मुळींहूनी । प्रांजळ चित्तें शुभाननी । मुखचंद्रा उचंबळी ॥ ६८ ॥

Transliteration

Aise bolataa Naatha vaanee | Bhaya phitale moolheenhooni | Praanjala chitten Shubhaananee | Mukha-chandraa uchambalee ||

Ovee 69

म्हणे महाराजा योगद्रुमा । सांडिला ठाव दावित्यें तुम्हां । पुढें चाले उगमा । नाथ जातसे सवें सवें ॥ ६९ ॥

Transliteration

Mhane Mahaaraajaa Yoga-drumaa | Saandilaa thaava daavityen tumhaa | Pudhe chaale ugamaa | Naatha jaatase saven saven ||

Ovee 70

तंव तो उकिरडा केर उद्दाम । गोवर पडिला पर्वतासमान । तेथें जाऊनि सुमधुम । नाथाप्रती सांगतसे ॥ ७० ॥

Transliteration

Tava toh ukiradaa kera uddaamu | Govara padilaa parvataa-samaanu | Tethe jaauuni sumadhuma | Naathaa-pratee saangatase ||

Ovee 71

हे महाराजा तपाजेठी । येथें सांडिली भस्मचिमुटी । ऐसें ऐकोनि नाथ होटीं । हांक मारी बालकातें ॥ ७१ ॥

Transliteration

Hey Mahaaraajaa Tapaaje-thee | Yethe saandilee bhasma-chimutee | Aise aikoni Naatha hotee | Haanka maaree baalakaate ||

Ovee 72

हे हरीनारायण प्रतापवंता । मित्रवर्या सूर्यसुता । जरी असशील या गोवरांत । नीघ त्वरित या समयीं ॥ ७२ ॥

Transliteration

Hey Hari-Naaraayana prataapa-vantaa | Mitra-varyaa Soorya-sutaa | Jaree asasheela yaa govaraantu | Neegha tvarita yaa samayee ||

Ovee 73

या गोवरगिरींत नरदेहजन्म । मिरवला असें तूतें उत्तम । तरी गोरक्ष ऐसें तूतें नाम । सुढाळपणीं मज वाटे ॥ ७३ ॥

Transliteration

Yaa Govara-gireeta nara-deha-janmu | Miravalaa asen toote uttamu | Taree Goraksha aise toote naamu | Sudhaala-panee maja vaate ||

Ovee 74

द्वादश वर्षेपर्यंत । बैसलासी गोवरक्षणार्थ । म्हणूनि गोवररक्षक नाम तूतें । पाचारितों स्वच्छंद्रें ॥ ७४ ॥

Transliteration

Dvaadasha varshe-paryantu | Baisalaasee Govara-kshanaarthu | Mhanuni Govara-rakshaka naama toote | Paachaarito svachchhandren ||

Ovee 75

तरी आतां न लावी उशीर । हे गोरक्षनाथा निघे बाहेर । ऐसे वदतां नाथ मच्छिंद्र । बाळशब्द उद्देला ॥ ७५ ॥

Transliteration

Taree aataa na laavee usheeru | Hey Goraksha-Naathaa nighe baaheru | Aise vadataa Naatha Machchindru | Baala-shabda uddelaa ||

Ovee 76

म्हणे महाराजा गुरुवर्या । गोरक्ष असें मी या ठाया । परी गोवरनगानें गुंफित काया । भार मौळी विराजला ॥ ७६ ॥

Transliteration

Mhane Mahaaraajaa Guru-varyaa | Goraksha asen mee yaa thaayaa | Paree Govara-nagaanen gumphita kaayaa | Bhaara mauli viraajalaa ||

Ovee 77

तेणेंकरुनि शरीरवेष्टण । झालें आहे दडपण । तरी गौरीयातें विचारुन । बाहेर काढीं महाराजा ॥ ७७ ॥

Transliteration

Tenen-karuni shareera-veshtanu | Jhaale aahe dadapanu | Taree Gauriyaate vichaarunu | Baahera kaadhee Mahaaraajaa ||

Ovee 78

ऐसें ऐकूनि बोले उत्तर । लौकरी आणून लोहपत्र । मही विदारुनि नगगौर । बाळतनू काढिली ॥ ७८ ॥

Transliteration

Aise aikuuni bole uttaru | Laukaree aanuuna loha-patru | Mahee vidaaruni naga-gauru | Baala-tanuu kaadhilee ||

Ovee 79

काढिली परी ती तनुलता । बालार्ककिरणीं दिसे समता । कीं घनमांदुसी विद्युल्लता । चमक दावी आगळी ॥ ७९ ॥

Transliteration

Kaadhilee paree tee tanu-lataa | Baalarka-kiraneen dise samataa | Kee ghana-maandusee vidyul-lataa | Chamaka daavee aagalee ||

Ovee 80

कीं पूर्ण चंद्र प्रकाश पौर्णिमेचा । दिशा उजळे समयीं निशीच्या । तेवी तनुगर्भ मदनाचा । जगामाजी मिरवला ॥ ८० ॥

Transliteration

Kee poorna Chandra prakaasha Paurnimechaa | Dishaa ujale samayee nisheechyaa | Tevee tanu-garma Madanaachaa | Jagaa-maajee miravalaa ||

Ovee 81

कीं दुसरा ईश तो चक्रधर । त्यजोनि आतां मूर्तिसार । वीट मानूनी क्षीरसागर । म्हणूनि येथें आला असे ॥ ८१ ॥

Transliteration

Kee dusaraa Eesha to Chakradharu | Tyajoni aataa moorti-saaru | Veeta maanuuni Ksheera-saagaru | Mhanuni yethe aalaa ase ||

Ovee 82

कुंकुमाकार पदपंकज । सकळ आंगोळ्या तेजःपुंज । चंद्राकारसम विराजे । नखें अग्न आंगोळी ॥ ८२ ॥

Transliteration

Kunkumaa-kaara pada-pankaju | Sakala aangolyaa teja-punju | Chandraa-kaara-sama viraaje | Nakhe agna aangolee ||

Ovee 83

घोटींव सुनीळ अपूर्व देखा । कीं इंद्रनिळाची झळके बिका । मनगटावरी अलौलिका । सकळ पोटरी विराजे ॥ ८३ ॥

Transliteration

Ghoteeva suneela apoorva dekhaa | Kee Indra-nilaachee jhalake bikaa | Managataa-varee alaulikaa | Sakala potaree viraaje ||

Ovee 84

गुडघ्यावरी जानुस्थळ । जैसे स्तंभ कर्दळीचे उभय सरळ । त्यावरी कटितटा अति निर्मळ । हरिमाजासम जाणावी ॥ ८४ ॥

Transliteration

Gudaghyaa-varee jaanu-sthalu | Jaise stambha kardaleeche ubhaya saralu | Tyaavaree kati-tata ati nirmalu | Hari-maajaa-sama jaanaavee ||

Ovee 85

कटीवरती नाभिघाम् । त्यावरतें हदय अति सुगम । सुगम परी विद्याधाम । ऐसेपरी वाटतसे ॥ ८५ ॥

Transliteration

Katee-varatee naabhi-ghaamu | Tyaavaraate hrudaya ati sugamu | Sugama paree vidyaa-dhaamu | Aiseparee vaatatase ||

Ovee 86

सरळ बाहु स्कंधीं शोभत । परी आजानबाहु दिसों येत । तयामाजी जग समस्त । उभ्या कर्दळी मिरवती ॥ ८६ ॥

Transliteration

Sarala baahu skandheen shobhatu | Paree aajaanabaahu diso yetu | Tayaa-maajee jaga samastu | Ubhyaa kardalee miravatee ||

Ovee 87

त्यातेंही अंगुळ्या सरळ प्रकाम । तयांअग्रीं नख उग्रतम । चंद्राकृती तेज उत्तम । कोर जैसी द्वितीयेची ॥ ८७ ॥

Transliteration

Tyaatehee angulyaa sarala prakaamu | Tayaa-agree nakha ugratamu | Chandraa-krutee teja uttamu | Kora jaisee dviteeyechee ||

Ovee 88

असो स्कंधामाजी ग्रीवा सकळ । घोटितां बीक दावी सकळ । तयावरी हनुवटी निर्मळ । अधरोपरी शोभतसे ॥ ८८ ॥

Transliteration

Aso skandhaa-maajee greevaa sakalu | Ghotitaa beeka daavee sakalu | Tayaavaree hanuvatee nirmalu | Adhara-uparee shobhatase ||

Ovee 89

अधर दंत जिव्हेसहित । आनन केवळ चंद्र मूर्तिमंत । परी आनन नोहे धाम निश्चित । वेदधनाचें विराजे ॥ ८९ ॥

Transliteration

Adhara danta jivhe-sahitu | Aanana kevala Chandra moortimantu | Paree aanana nohe dhaama nishchitu | Veda-dhanaachen viraaje ||

Ovee 90

सरळ नासिका शुकाग्रवत । उभय चक्षु विशाळवंत । चक्षु नव्हेत ते शशिआदित्य । नांदावया पातले ॥ ९० ॥

Transliteration

Sarala naasikaa shukaa-gravatu | Ubhaya chakshu vishaala-vantu | Chakshu navhete tey Shashi-Aadityu | Naandaavayaa paatale ||

Ovee 91

भाळ विशाळ कबरी भार । कुरळ वरती पिंगटाकार । ऐसा महाराज सर्वेश्वर । उदया आला वाटतें ॥ ९१ ॥

Transliteration

Bhaala vishaala kabaree bhaaru | Kurada varatee pingataa-kaaru | Aisaa Mahaaraaja Sarveshvaru | Udayaa aalaa vaatate ||

Ovee 92

द्वादश वर्षे अलोलिक । सर्वगुणी पाहतां बालक । सरस्वतीनें भाळी देख । तर्जनीतें लाविलें ॥ ९२ ॥

Transliteration

Dvaadasha varshe aloliku | Sarva-gunee paahataa baalaku | Sarasvateenen bhaalee dekhu | Tarjaneete laavile ||

Ovee 93

मनांत म्हणे ती गोरटी । आहा जनीं मीच करंटी । ऐसा पुत्र माझिये पोटीं । येतां दैवें उच्छेदिला ॥ ९३ ॥

Transliteration

Manaata mhane tee goratee | Aahaa janee meech karantee | Aisaa putra maajhiye potee | Yetaa daiven uchchhedilaa ||

Ovee 94

चित्तीं उठोनि परम तळमळ । नेत्रीं दाटलें अपार जळ । मोहें करपें हृदयकमळ । रुदनसंवादा अनुवादी ॥ ९४ ॥

Transliteration

Chittee uthoni parama talamalu | Netreen daatale apaara jalu | Mohen karape hrudaya-kamalu | Rudana-samvaadaa anuvaadee ||

Ovee 95

तें पाहूनि मच्छिंद्रनाथ । म्हणे खेद कां वो करिसी व्यर्थ । तुझा नव्हता तो सुत । प्राप्त कैसा होईल ॥ ९५ ॥

Transliteration

Tey paahuuni Machchindra-Naathu | Mhane kheda kaa vo karisee vyarthu | Tujhaa navhataa toh sutu | Praapta kaisaa hoeelu ||

Ovee 96

पहा पहा अन्नयोग । श्वान पराचा भक्षितो भाग । परी उलटोनि रसनामार्ग । श्वान दैवें विराजे ॥ ९६ ॥

Transliteration

Pahaa pahaa anna-yogu | Shvaana paraachaa bhakshito bhaagu | Paree ulatoni rasanaa-maargu | Shvaana daiven viraaje ||

Ovee 97

तन्न्यायें मूर्तिमंत । विभाग नसे हा ऐसा सुत । आता शोक करिसी कां व्यर्थ । नवशापविभाग मिरविसी ॥ ९७ ॥

Transliteration

Tannyaayen moortimantu | Vibhaaga nase haa aisaa sutu | Aataa shoka karisee kaa vyarthu | Nava-shaapa-vibhaaga miravisee ||

Ovee 98

तरी जा तूं येथूनी । नाहक घेसील शापवाणी । माझा कोप प्रत्यक्ष अग्नी । ब्रह्मादिकां साहेना ॥ ९८ ॥

Transliteration

Taree jaa too yethooni | Naahaka gheseela shaapa-vaanee | Maajhaa kopa pratyaksha agnee | Brahmaadikaa saahenaa ||

Ovee 99

ऐसी बोलिला क्रूर वार्ता । सरस्वती पावली भय चित्ता । मागें पाऊल ठेवूनि तत्त्वतां । निजसदना पातली ॥ ९९ ॥

Transliteration

Aisee bolilaa kroora vaartaa | Sarasvatee paavalee bhaya chittaa | Maage paaula thevuuni tattvataa | Nija-sadanaa paatalee ||

Ovee 100

येरीकडे गोरक्षनाथें । येऊनि वंदिलें गुरुपदातें । मच्छिंद्रनाथ तो प्रसन्नचित्तें । अनुग्रह ओपितसे ॥ १०० ॥

Transliteration

Yereekade Goraksha-Naathe | Yeuuni vandile Guru-padaate | Machchindra-Naatha toh prasanna-chitten | Anugraha opitase ||

Ovee 101

ॐ इति एकाक्षर अक्षर । संबोधीत समग्र । नारायणीं नामोच्चार । मंत्रविधीनें निरोपिला ॥ १०१ ॥

Transliteration

Om iti ekaakshara aksharu | Sambodheeta samagru | Naaraayaneen naamo-chchaaru | Mantra-vidheenen niropilaa ||

Ovee 102

वरदहस्त ठेवूनि मौळीं । सकळ निवटिली अज्ञानकाजळी । वरदविभूती चर्चूनि भाळीं । मुख कुरवाळी प्रेमानें ॥ १०२ ॥

Transliteration

Varada-hasta thevuuni mauli | Sakala nivatilee ajnaana-kaajalee | Varada-vibhootee charchooni bhaalee | Mukha kuravaalee premaanen ||

Ovee 103

मग हस्त धरोनि तत्त्वतां । म्हणे तान्हुल्या ऊठ आतां । महीचे गोचर करुनि तीर्था । हरिपरायणा सकामातें ॥ १०३ ॥

Transliteration

Maga hasta dharooni tattvataa | Mhane taanhulyaa ootha aataa | Maheeche gochara karuni teerthaa | Hari-paraayanaa sakaamaate ||

Ovee 104

अवश्य म्हणूनि गोरक्षनाथ । सलीन चरणीं माथा ठेवित । श्रीमच्छिंद्राचा धरुनि हस्त । गमन करिता पैं झाला ॥ १०४ ॥

Transliteration

Avashya mhanuni Goraksha-Naatha | Saleena charanee maathaa thevitu | Shree-Machchindraachaa dharuni hastu | Gamana karitaa pai jhaalaa ||

Ovee 105

चंद्रागिरींस्थान सोडूनि । करिती जगन्नाथीं गमन । तों मार्गी जातां एक ग्राम । कनकगिरि लागला ॥ १०५ ॥

Transliteration

Chandraagiree-sthaana sodooni | Karitee Jagannaathee gamanu | Toh maargee jaataa eka graamu | Kanaka-Giri laagalaa ||

Ovee 106

मच्छिंद्र पाहता ग्राम सुरस । बोलतां झाला गोरक्षास । बा रे प्रारंभ क्षुधेस । जठरामाजी दाटला ॥ १०६ ॥

Transliteration

Machchindra paahataa graama surasu | Bolataa jhaalaa Gorakshaasu | Baa re prarambha kshudhesu | Jatharaa-maajee daatalaa ||

Ovee 107

कक्षेमाजी घालूनि झोळी । बा रे संचरोनी वस्तिमेळीं । भिक्षा मागूनि ये वेळीं । क्षुधा माझी हरी कीं ॥ १०७ ॥

Transliteration

Kakshe-maajee ghaaluuni jholee | Baa re sancharooni vasti-melee | Bhikshaa maaguuni ye velee | Kshudhaa maajhee Hari kee ||

Ovee 108

अवश्य म्हणूनि गोरक्षनाथ । सत्वर झोळी कक्षे घेत । संचरोनि कनकग्रामांत । भिक्षा मागे घरोघरीं ॥ १०८ ॥

Transliteration

Avashya mhanuni Goraksha-Naathu | Satvara jholee kakshe ghetu | Sancharooni Kanaka-Graamaatu | Bhikshaa maage gharo-gharee ||

Ovee 109

भिक्षा मागतां अति उद्देशीं । तंव तो गेला एका विप्रगृहासी । तेथें पाहतां ते दिवशीं । पितृश्राद्ध मिरवलें ॥ १०९ ॥

Transliteration

Bhikshaa maagataa ati uddeshee | Tava toh gelaa ekaa Vipra-gruhaasee | Tethe paahataa tey divashee | Pitru-shraaddha miravale ||

Ovee 110

विप्र करुनियां भोजन । उपरी मागत्यासी देतसे अन्न । ते संधीसी गोरक्ष जाऊन । 'अलक्ष' जल्पतसे ॥ ११० ॥

Transliteration

Vipra karuniyaa bhojanu | Upari maagatyaasee detase annu | Tey sandheesee Goraksha jaauunu | 'Alaksha' jalpatase ||

Ovee 111

तंव त्या घरची नितंबिनी । महाप्राज्ञिक सुस्वरुपिणी । क्षमाशांतीची लावण्यखाणी । सर्वगुणीं संपन्न ॥ १११ ॥

Transliteration

Tava tyaa gharchi nitambinee | Mahaa-praajnika susvarupinee | Kshamaa-shaanteechee laavanya-khaanee | Sarva-guneen sampannu ||

Ovee 112

तिनें पाहतां गोरक्षनाथ । भाविती झाली चित्तांत । म्हणे धन्य हें बाळ अतित । चांगुलपर्णी मिरवतसे ॥ ११२ ॥

Transliteration

Tinien paahataa Goraksha-Naathu | Bhaavitee jhaalee chittaatu | Mhane dhanya hey baala atitu | Chaangula-parnee miravatase ||

Ovee 113

प्रत्यक्ष मातें भासे कैसा । कीं बालर्कतनूचा ओतिला ठसा । कीं हरुनि चपळेचें मांदुसा । महीलागीं उतरला ॥ ११३ ॥

Transliteration

Pratyaksha maate bhaase kaisaa | Kee Baalarka-tanuuchaa otilaa thasaa | Kee haruni chapalechen maandusaa | Mahee-laagee utaralaa ||

Ovee 114

परी हा तापसी योगी वरिष्ठ । मातें भासतो योग हा श्रेष्ठ । पूर्वीचा कोणी योगभ्रष्ट । जगामाजी मिरवतसे ॥ ११४ ॥

Transliteration

Paree haa taapasee Yogi varishthu | Maate bhaasato yoga haa shreshthu | Poorveechaa konee yoga-bhrashtu | Jagaa-maajee miravatase ||

Ovee 115

ऐसें जाणूनि लवडसवडी । पात्रीं पदार्थ स्वकरें वाढी । अन्नसामग्री अति तांतडी । घेऊनि आली भिक्षेसी ॥ ११५ ॥

Transliteration

Aise jaanuuni lavada-savadee | Paatreen padartha sva-karen vaadhee | Anna-saamagree ati taantadee | Gheuuni aalee bhikshesee ||

Ovee 116

खाज्या करंज्या पदार्थ धिवर । पोळी भात शिरा कचोर । मालुपुव्यादि सुकुमार । परम मृदू भक्ष्य तो ॥ ११६ ॥

Transliteration

Khaajyaa karanjyaa padartha dhivaru | Polee bhaata shiraa kachoru | Maalupuvyaadi sukumaru | Parama mrudoo bhakshya toh ||

Ovee 117

चोटी मुगदळ बुंदी विशेष । पूर्ण पोळिया विस्तीर्ण पात्रास । धान्या पुऱ्या पंच मधुरस । श्रद्धापूर्ण ठेविल्या ॥ ११७ ॥

Transliteration

Chotee mugadala bundee visheshu | Poorna poleyaa visteerna paatraasu | Dhaaryaa (Dhaanyaa) puryaa pancha madhurasu | Shraddhaa-poorna thevilyaa ||

Ovee 118

वडया पातवडया शाखा बहुत । सौभ्यमट्ठकाचे द्रोण थरित । कोशिंबिरी आंबेरायतें । बहु भात चटणिया ॥ ११८ ॥

Transliteration

Vadyaa paatavadyaa shaakhaa bahutu | Saubhya-matthakaache drone tharitu | Koshimbiree aamberaayate | Bahu bhaata chataniyaa ||

Ovee 119

कढी सांबारें वडी त्यांत । सार आमटी चणचणीत । नाना द्रोण भरुनि घृत । मेतकुटादि वाढिलें ॥ ११९ ॥

Transliteration

Kadhee saambaaren vadee tyaatu | Saara aamtee chanachaneetu | Naanaa drone bharuni ghrutu | Metakutadi vaadhile ||

Ovee 120

मध्यभागीं ठेवूनि भात । त्यावरी वरण कनकवर्णात । तळीं वडे पोखरे दह्यांत । घालोनियां वाढिलें ॥ १२० ॥

Transliteration

Madhya-bhaageen thevooni bhaatu Tyaavari varana kanaka-varnaatu Taleen vade pokhare dahyaatu Ghaaloniyaa vaadhileen

Ovee 121

ऐसियापरी षड्रसान्न । घवघवीत पात्र वाढून । श्रीगोरक्षापुढें ठेवून । नमस्कारी प्रीतीनें ॥ १२१ ॥

Transliteration

Aisiyaa-paree shad-rasaannu | Ghavaghaveeta paatra vaadhuunu | Shree-Gorakshaa-pudhe thevuunu | Namaskaaree preeteenen ||

Ovee 122

गोरक्ष पाहतां पात्र सुरस । मनीं वाटला परम हर्ष । चित्तीं म्हणे त्या नितंबिनीस । धन्य धन्य माउले ॥ १२२ ॥

Transliteration

Goraksha paahataa paatra surasu | Manee vaatalaa parama harshu | Chittee mhane tyaa nitambineesu | Dhanya dhanya maaule ||

Ovee 123

अहा आम्ही कोठील कोण । नोहे इष्ट सोयरे जन । आम्हासाठीं सिद्ध करुन । पात्र वाढून आणिलें ॥ १२३ ॥

Transliteration

Ahaa aamhee kotheela konu | Nohe ishta soyare janu | Aamhaa-saathee siddha karunu | Paatra vaadhuuna aanile ||

Ovee 124

पात्र पहा घवघवीत । हें पात्र नोहें यथार्थ । शिवलिंगी शोभला भात । पात्र शाळुंका मिरवली ॥ १२४ ॥

Transliteration

Paatra pahaa ghavaghaveetu | Hey paatra nohe yathaarthu | Shiva-lingee shobhalaa bhaatu | Paatra shaalunkaa miravalee ||

Ovee 125

नाना पदार्थ अर्थप्रकरण । तें शिवासी अपार सुगम । कीं शिवलाखोली ढांसळून । शाळुंकाते मिरविली ॥ १२५ ॥

Transliteration

Naanaa padartha artha-prakaranu | Tey Shivaasee apaara sugamu | Kee Shiva-laakholee dhaansaloonu | Shaalunkaate miravilee ||

Ovee 126

कीं प्रीतीं पाहतां तो भात । सकळ अन्नाचा प्रभु शोभत । पात्रमहीतें प्रीतीनें बहुत । नाना पदार्थ मिरवलें ॥ १२६ ॥

Transliteration

Kee preeteen paahataa toh bhaatu | Sakala annaachaa prabhu shobhatu | Paatra-maheete preeteenen bahutu | Naanaa padartha miravale ||

Ovee 127

तरी शाक नोहे पुतनावेळ । खाजें मंत्री दिसे सकळ । मौळीं छत्र तेजाळ । वरान्न हें मिरविले ॥ १२७ ॥

Transliteration

Taree shaaka nohe putanaa-velu | Khaaje mantri dise sakalu | Mauli chhatra tejaalu | Varaanna hey miravile ||

Ovee 128

ऐसा भास भासूनि हृदयीं । पात्र कक्षझोळीन ठेवी । आशीर्वचने तोषवूनि बाई । जाता झाला महाराज ॥ १२८ ॥

Transliteration

Aisaa bhaasa bhaasuuni hrudayee | Paatra kaksha-jholeena thevee | Aasheer-vachane toshavuuni baai | Jaataa jhaalaa Mahaaraaju ||

Ovee 129

चित्तीं म्हणे उदरापुरतें । प्राप्त अन्न झालें मातें । आतां वेंचूनि स्वकष्टातें । केवीं हिंडावें घरोघरीं ॥ १२९ ॥

Transliteration

Chittee mhane udara-purate | Praapta anna jhaale maate | Aataa venchuuni sva-kashtaate | Kevee hindaave gharo-gharee ||

Ovee 130

ऐसा विचार करुनि चित्तीं । येऊनि वंदिलें श्रीगुरुमूर्ती । भिक्षाझोळी कक्षेंतूनि निगुते । काढूनि ठेवी पुढारां ॥ १३० ॥

Transliteration

Aisaa vichaara karuni chittee | Yeuuni vandile Shree-Guru-moortee | Bhikshaa-jholee kakshe-tooni nigute | Kaadhuuni thevee pudhaaraa ||

Ovee 131

तंव ती प्रत्यक्ष तपोमौळी । विकासूनि पाहे झोळी । तंव तें अन्न सुंदर परिमळीं । निजदृष्टीं देखिलें ॥ १३१ ॥

Transliteration

Tava tee pratyaksha Tapo-mauli | Vikaasuuni paahe jholee | Tava tey anna sundara parimalee | Nija-drishteen dekhile ||

Ovee 132

मग तें घेऊनि आपुलेपासीं । भोजन करी योगींद्र तापसी । अन्न स्वादिष्ट रसनेसी । लागतां भक्षी आवडीनें ॥ १३२ ॥

Transliteration

Maga tey gheuuni aapule-paasee | Bhojana karee Yogindra taapasee | Anna svaadishta rasanesee | Laagataa bhakshi aavadeenen ||

Ovee 133

मुखामाजी कवळ करितां । रसना न लावी दंतां । म्हणे दे तरकी होतील आतां । लवडसवडी लोटीतसे ॥ १३३ ॥

Transliteration

Mukhaa-maajee kavala karitaa | Rasanaa na laavee dantaa | Mhane de tarakee hoteela aataa | Lavada-savadee loteetase ||

Ovee 134

जठरभांडारीं भरुनि भरतें । आणीक इच्छे नाहीं पुरतें । परी सर्व पदार्थ कामनायुक्त । वंडा प्रिय मिरवला ॥ १३४ ॥

Transliteration

Jathara-bhaandaaree bharuni bharate | Aaneeka ichchhe naahee purate | Paree sarva padartha kaamanaa-yuktu | Vadaa priya miravalaa ||

Ovee 135

परी पदार्थ अपूर्वपणीं । कामना येथें राहिली मनीं । कीं वडा आणीक असतां भोजनीं । चांगुलपणा मिरवितो ॥ १३५ ॥

Transliteration

Paree padartha apoorva-panee | Kaamanaa yethe raahilee manee | Kee vadaa aaneeka asataa bhojanee | Chaangula-panaa miravitoh ||

Ovee 136

ऐसी चित्तीं कल्पना आणून । पाहता झाला गोरक्षवदन । तों सच्छिष्य ओळखून । बोलता झाला गुरुसी ॥ १३६ ॥

Transliteration

Aisee chittee kalpanaa aanuunu | Paahataa jhaalaa Goraksha-vadanu | Toh sachchishya olakhuunu | Bolataa jhaalaa Guru-see ||

Ovee 137

म्हणे महाराजा तपोधना । कवण कामना आली मना । तो अर्थ उघड दावूनि वचना । आम्हां कार्या निरोपावें ॥ १३७ ॥

Transliteration

Mhane Mahaaraajaa Tapo-dhanaa | Kavana kaamanaa aalee manaa | Toh artha ughada daavuuni vachanaa | Aamhaa kaaryaa niropaave ||

Ovee 138

येरु म्हणे गोरक्षनंदना । कामना वेधली माझिया मना । आणिक वडा असता भोजना । तृप्त चित्तीं मिरवतों ॥ १३८ ॥

Transliteration

Yeru mhane Goraksha-nandanaa | Kaamanaa vedhalee maajhiyaa manaa | Aanika vadaa asataa bhojanaa | Trupta chittee miravatoh ||

Ovee 139

ऐसें ऐकोनि गुरुचें चोज । म्हणे गुरुराजा महाराज । आतांचि वडा आणूनि सहज । तुम्हांप्रती देईन मी ॥ १३९ ॥

Transliteration

Aise aikoni Guru-chen choju | Mhane Guru-raajaa Mahaaraaju | Aataanchi vadaa aanuuni sahaju | Tumhaa-pratee daeena mee ||

Ovee 140

ऐसें म्हणूनि तात्काळिक । उठता झाला तपोनायक । विप्रगृहीं येऊनि देख । मारी हांक गोरक्ष तो ॥ १४० ॥

Transliteration

Aise mhanuni taatkaaliku | Uthataa jhaalaa Tapo-naayaku | Vipra-gruheen yeuuni dekhu | Maaree haanka Goraksha toh ||

Ovee 141

म्हणे माय वो माय आतां । आणिक वडा दे तत्त्वतां । मम गुरुची कामना असे चित्ता । तृप्ती अस्तातें पावेना ॥ १४१ ॥

Transliteration

Mhane maaya vo maaya aataa | Aanika vadaa de tattvataa | Mama Guru-chee kaamanaa ase chittaa | Truptee astaate paavenaa ||

Ovee 142

तंव ते बोले नितंबिनी । आलासी गुरुचें निमित्त करोनी । परी सकामसविता स्वेच्छापणीं । हृदयापात्रीं हेलावे ॥ १४२ ॥

Transliteration

Tava tey bole nitambinee | Aalaasee Guru-chen nimitta karonee | Paree sakaama-savitaa svechchhaa-panee | Hrudayaa-paatreen helaave ||

Ovee 143

मातें दावूनि गुरुभक्ती । कामने करुं पाहसी तृप्ती । तस्मात् सकळ अर्थ कळूं आला चित्तीं । मजलागीं जाण पां ॥ १४३ ॥

Transliteration

Maate daavuuni Guru-bhaktee | Kaamane karoo paahasee truptee | Tasmaat sakala artha kaloo aalaa chittee | Maja-laagee jaana paa ||

Ovee 144

येरु म्हणे जननी ऐसें । कामनीं वेधलें नाहीं मानस । गुरुइच्छा कामउद्देश । पाहूं आलों त व ठाया ॥ १४४ ॥

Transliteration

Yeru mhane Jananee aise | Kaamaneen vedhale naahee maanasu | Guru-ichchhaa kaama-uddeshu | Paahoo aalo tava thaayaa ||

Ovee 145

तंव ती बोले विप्रनंदिनी । गुरुअर्थ काम मी । वेधली म्हणतोसी तरी प्राज्ञी । वन माजें ऐकावें ॥ १४५ ॥

Transliteration

Tava tee bole Vipra-nandinee | Guru-artha kaama mee | Vedhalee mhanatosee taree praajnee | Vana maajen aikaave ||

Ovee 146

अगा मम भक्तीचे प्रसंगेंकरुन । तूतें दिधलें पहा वाढून । पुन्हां आलासी मागून । तरी तें नाहीं फुकाचें ॥ १४६ ॥

Transliteration

Agaa mama bhaktee-che prasangen-karunu | Toote didhale pahaa vaadhuunu | Punhaa aalaasee maaguunu | Taree tey naahee phukaachen ||

Ovee 147

येरु म्हणे तरी त्यास । काय लागतें सांग आम्हांस । तेंचि देऊनि तूतें खास । वडे जाण इच्छितों ॥ १४७ ॥

Transliteration

Yeru mhane taree tyaasu | Kaaya laagate saanga aamhaasu | Techi deuuni toote khaasu | Vade jaana ichchhitoh ||

Ovee 148

येरी म्हणे गुरुभक्ती । मातें दावूं पावलासी शक्ती । परी वडे अन्नावरते पाहिजेत । डोळा काढूनि देई कां ॥ १४८ ॥

Transliteration

Yeree mhane Guru-bhaktee | Maate daavoo paavalaasee shaktee | Paree vade annaa-varate paahijete | Dolaa kaadhuuni daee kaa ||

Ovee 149

येरु म्हणे काय कठिण । चक्षुकामनीं वेधलें मन । तरी चक्षु आतां देईन जाण । उशीर नसे या कार्या ॥ १४९ ॥

Transliteration

Yeru mhane kaaya kathinu | Chakshu-kaamaneen vedhale manu | Taree chakshu aataa deeena jaanu | Usheera nase yaa kaaryaa ||

Ovee 150

ऐसें बोलुनि केलें कौतुका । तत्काळ अंगुळी अनामिका । चक्षुद्वारी घालोनि देखा । बाहेर काढिलें बुबुळातें ॥ १५० ॥

Transliteration

Aise boluni kele kautukaa | Tatkaala angulee anaamikaa | Chakshu-dvaaree ghaaloni dekhaa | Baahera kaadhile bubulaate ||

Ovee 151

बुबुळगोळ वामकरतटी । ठेवितां लोटला रुधिर पाटी । जैसा नगीं झरा लोटीं । अकस्माद उदभवलासे ॥ १५१ ॥

Transliteration

Bubula-gola vaama-kara-tatee | Thevitaa lotalaa rudhira paatee | Jaisaa nageen jharaa lotee | Akasmaada udabhavalaase ||

Ovee 152

कीं मांदारनदी स्वर्गीहुनी । उत्तरे मनकर्णिकेचे जीवनीं । तन्न्यायें चक्षुद्वाराहूनी । लोटे लोटला रुधिराचा ॥ १५२ ॥

Transliteration

Kee Maandaara-nadee svargee-hooni | Uttare Manakarnike-che jeevanee | Tannyaayen chakshu-dvaaraa-hooni | Lote lotalaa rudhiraachaa ||

Ovee 153

म्हणावी ती रुधिर नोहे शक्ती । दाखवूं पातली गुरुभक्ती । विप्रकामना पात्र भरुनि । जीवनभागीरथी दाविली ॥ १५३ ॥

Transliteration

Mhanaavee tee rudhira nohe shaktee | Daakhavoo paatalee Guru-bhaktee | Vipra-kaamanaa paatra bharuni | Jeevana-Bhaageerathee daavilee ||

Ovee 154

कां ते जाया हेलनभाव । ती सागराची मिरवली ठेव । तदर्थ जीवनभागिरथीराव । गोरक्षनगीची आणिली असे ॥ १५४ ॥

Transliteration

Kaa tey jaayaa helana-bhaavu | Tee saagaraachee miravalee thevu | Tad-artha jeevana-Bhaageerathee-raavu | Goraksha-nageechee aanilee ase ||

Ovee 155

असों ऐसें तेणें रुधिरा । लोट लोटला महीवरा । तें पाहूनि चिंतातुरा । प्रेमें जाया मिरवली ॥ १५५ ॥

Transliteration

Ason aise tenen rudhiraa | Lota lotalaa mahee-varaa | Tey paahuuni chintaa-turaa | Preemen jaayaa miravalee ||

Ovee 156

रुधिर वाहतां भडभडाट । महीं लोटला रक्तपाट । खंडणा नोहे परम अचाट । भूषण मिरवी लोकातें ॥ १५६ ॥

Transliteration

Rudhira vaahataa bhadabhadaatu | Maheen lotalaa rakta-paatu | Khandanaa nohe parama achaatu | Bhooshana miravee lokaate ||

Ovee 157

तरी तो पाहतां रुधिरपाट । नोहे धरादेवीचा शुद्ध मळवट । भाळीं चर्चूनि कुंकुमपाट । भूषण मिरवी लोकांतें ॥ १५७ ॥

Transliteration

Taree toh paahataa rudhira-paatu | Nohe Dharaa-devee-chaa shuddha malavatu | Bhaaleen charchooni kunkuma-paatu | Bhooshana miravee lokaate ||

Ovee 158

ऐसी ती विप्रदारा पाहून । लज्जित झाली अरिष्टापण । परम चित्तीं खोच मानून । सदनामाजी परतली ॥ १५८ ॥

Transliteration

Aisee tee vipradaaraa paahoonu | Lajjita jhaalee arishtaapanu | Parama chittee khocha maanoonu | Sadanaamaajee paratalee ||

Ovee 159

चित्तीं म्हणे हा अहाहा कैसें । बोलतां झालें विपर्यासें । धन्य हा एक शिष्य असे । जगामाजी मिरवला ॥ १५९ ॥

Transliteration

Chittee mhane haa ahaahaa kaise | Bolataa jhaale viparyaase | Dhanya haa eka shishya ase | Jagaa-maajee miravalaa ||

Ovee 160

अहा कैसें केलें धैर्यपण । बोलतांचि काढिला जेणें नयन । परी ती व्यापूनि भयसंपन्न । म्लानवदन मिरवली ॥ १६० ॥

Transliteration

Ahaa kaise kele dhairya-panu | Bolataachi kaadhilaa jenen nayanu | Paree tee vyaapuuni bhaya-sampannu | Mlaana-vadana miravalee ||

Ovee 161

मग वडे घेऊनि सातपांच । देऊं पातली लगबगें साच । पुढें ठेवूनि वदे वाचे । ऐक्याथें करी भावार्थ ॥ १६१ ॥

Transliteration

Maga vade gheuuni saata-paanchu | Deoo paatalee lagabagen saachu | Pudhe thevuuni vade vaache | Aikyaathe karee bhaavaarthu ||

Ovee 162

उपरी जोडूनि उभय पाणी । विनंती करी म्लानवदनीं । म्हणे महाराजा सहजबाणी । शब्द माझा उदेला ॥ १६२ ॥

Transliteration

Upari jodooni ubhaya paanee | Vinantee karee mlaana-vadanee | Mhane Mahaaraajaa sahaja-baanee | Shabda maajhaa udelaa ||

Ovee 163

परी उदय होतां न लावितां वेळ । तुम्ही बाहेर काढिलें बुबुळ । परी मम अन्यायी शब्द केवळ । क्षमापात्रीं मिरवणें ॥ १६३ ॥

Transliteration

Paree udaya hotaa na laavitaa velu | Tumhee baahera kaadhile bubulu | Paree mama anyaayee shabda kevalu | Kshamaa-paatreen miravane ||

Ovee 164

तुम्ही कृपाळू संपूर्ण । बैमतां अंगीं क्लेश धरुन । परी तितुकें दुःख पराकारण । देऊं ऐसें वाटेना ॥ १६४ ॥

Transliteration

Tumhee kripaalu sampoornu | Baisataa angeen klesha dharunu | Paree tituke dukha paraa-kaaranu | Deoo aise vaatenaa ||

Ovee 165

कीं कमळ करी अस्तसमयीं । घ्यावया विद्रा इच्छा घेत हदयी । परी तें दुःखप्रवाही । कदाकाळी मिरवेना ॥ १६५ ॥

Transliteration

Kee kamala karee asta-samayee | Ghyaavayaa vidraa ichchhaa gheta hrudayee | Paree tey dukha-pravaahee | Kadaa-kaalee miravenaa ||

Ovee 166

शेवटीं आपण पावोनि मरण । परातें कळिके सुख ओपून । राहे तन्न्यायें करुन । तुम्ही संत आहाती ॥ १६६ ॥

Transliteration

Shevateen aapana paavoni maranu | Paraate kalike sukha opoonu | Raahe tannyaayen karunu | Tumhee santa aahaatee ||

Ovee 167

उपरी बोले गोरक्षनाथ । तूं किमर्थ झालीस भयभीत । वडे अन्न तत्प्राप्त्यर्थ । चक्षु दिधला म्यां आपुला ॥ १६७ ॥

Transliteration

Upari bole Goraksha-Naathu | Too kimartha jhaaleesa bhaya-bheetu | Vade anna tat-praaptyarthu | Chakshu didhalaa myaa aapulaa ||

Ovee 168

तरी तूं भयभीत न होई सकळ । स्वकरीं माझें विराजे बुबुळ । येरी म्हणे तपस्वी स्नेहाळ । कृपा करीं मजवरी ॥ १६८ ॥

Transliteration

Taree too bhaya-bheeta na hoee sakalu | Sva-kareen maajhe viraaje bubulu | Yeree mhane tapasvee snehaalu | Kripaa karee maja-varee ||

Ovee 169

इतुकें देऊनि मातें दान । बुबुळासहित नेईजे अन्न । आपुलें कार्य संपादून । क्षमा वाढवीं आमुतें ॥ १६९ ॥

Transliteration

Ituke deuuni maate daanu | Bubulaa-sahita naeeje annu | Aapule kaarya sampaaduunu | Kshamaa vaadhavee aamute ||

Ovee 170

ऐसें ऐकूनि गोरक्षनाथ । म्हणे तूं न होई भयभीत । बुबुळासह वडे अन्नातें । घेऊनियां चालिलो ॥ १७० ॥

Transliteration

Aise aikuuni Goraksha-Naathu | Mhane too na hoee bhaya-bheetu | Bubulaa-saha vade annaate | Gheuuniyaa chaalilo ||

Ovee 171

चक्षूसी आडवोनि पदर । जावोनि उभा राहिला गुरुसमोर । वाचे बोले नम्रोत्तर । इच्छा पूर्ण करा जी ॥ १७१ ॥

Transliteration

Chakshoo-see aadavoni padaru | Jaavoni ubhaa raahilaa Guru-samoru | Vaache bole namrottaru | Ichchhaa poorna karaa jee ||

Ovee 172

परी तो कनवाळु मच्छिंद्रनाथ । सच्छिष्याचें मुख पाहत । तंव वसनपदर चक्षूवरतें । घेऊनियां मिरवला ॥ १७२ ॥

Transliteration

Paree toh kanavaalu Machchindra-Naathu | Sachchishyaachen mukha paahatu | Tava vasana-padara chakshoo-varate | Gheuuniyaa miravalaa ||

Ovee 173

तें पाहूनि चक्षुवसन । म्हणे चक्षू झांकिला केवीं वसनें । येरु म्हणे उगेच करुन । चक्षु वसनें धरियेला ॥ १७३ ॥

Transliteration

Tey paahuuni chakshu-vasanu | Mhane chakshoo jhaankilaa kevee vasanen | Yeru mhane ugecha karunu | Chakshu vasanen dhariyelaa ||

Ovee 174

मनांत कल्पी गोरक्षनाथ । जरी मी यातें करीं श्रुत । तरीं धिक्करुनि वडे अन्नासहित । दुःखप्रवाहीं मिरवेल ॥ १७४ ॥

Transliteration

Manaanta kalpee Goraksha-Naathu | Jaree mee yaate karee shrutu | Tareen dhikkaruni vade annaa-sahitu | Dukha-pravaaheen miravelu ||

Ovee 175

जेसा श्रावणाचा अंतकाळ । ऐकतां न सेविती वृद्ध तेथें केवळ । तन्न्यायें येथें केवळ । दुःखसरिता लोटेल ॥ १७५ ॥

Transliteration

Jaisaa Shraavanaachaa anta-kaalu | Aikataa na sevitee vriddha tethe kevalu | Tannyaayen yethe kevalu | Dukha-saritaa lotelu ||

Ovee 176

म्हणूनि पुसतां गुरुंनीं वचन । बोले श्रीगुरुतें गौप्य धरुन । सहजस्थिती चक्षुवसन । धरिलें असें महाराजा ॥ १७६ ॥

Transliteration

Mhanuni pusataa Guru-neen vachanu | Bole Shree-Guru-tey gaupya dharunu | Sahaja-sthitee chakshu-vasanu | Dharile asen Mahaaraajaa ||

Ovee 177

येरु म्हणे बा मुखकमळा । प्रत्यक्ष पाहूं दे माझिया डोळां । येरु म्हणे गुरुस्नेहाळा । भोजन झालिया दाखवीन ॥ १७७ ॥

Transliteration

Yeru mhane baa mukha-kamalaa | Pratyaksha paahoo de maajhiyaa dolaa | Yeru mhane Guru-snehaalaa | Bhojana jhaaliyaa daakhaveenu ||

Ovee 178

मी तों असतां सहजस्थिती । कीं परी उगलाच नयन केउतगती । ठणका उठला चक्षुप्रती । आला की काय कळेना ॥ १७८ ॥

Transliteration

Mee toh asataa sahaja-sthitee | Kee paree ugalaacha nayana keutagatee | Thankaa uthalaa chakshu-pratee | Aalaa kee kaaya kalenaa ||

Ovee 179

तरी तें दावूनि चक्षुद्वार । परम दिसेल अपवित्र । किळस बाधील भोजनोत्तर । चक्षु पहावा महाराजा ॥ १७९ ॥

Transliteration

Taree tey daavuuni chakshu-dvaaru | Parama disela apavitru | Kilasa baadheela bhojana-uttaru | Chakshu pahaavaa Mahaaraajaa ||

Ovee 180

येरु म्हणे बा न घडे ऐसें । आधीं पाहुनि तव मुखास । नंतर सारुं भोजनास । दुःख तुझें हरोनियां ॥ १८० ॥

Transliteration

Yeru mhane baa na ghade aisen | Aadheen paahuni tava mukhaasu | Nantara saaroo bhojanaasu | Dukha tujhen haroniyaa ||

Ovee 181

जरी तूं करिसी अनमान । तरी प्रत्यक्ष गोमांसमान । मानीन हें अन्न निश्वय जाण । चक्षु आधीं दावी कां ॥ १८१ ॥

Transliteration

Jaree too karisee anamaanu | Taree pratyaksha go-maasa-maanu | Maaneena hey anna nishvaya jaanu | Chakshu aadheen daavee kaa ||

Ovee 182

ऐसें ऐकतां निर्वाणवचन । गोरक्ष बोले श्रीगुरु कारण । कीं मागूं गेलों वडेअन्न । कथा झाली ती ऐका ॥ १८२ ॥

Transliteration

Aise aikataa nirvaana-vachanu | Goraksha bole Shree-Guru kaarana | Kee maagu gelo vade-annu | Kathaa jhaalee tee aikaa ||

Ovee 183

जया घरीं वडेअन्न । तेथील सद्भक्ति आहे कामिन । तिनोंचे प्रथम दिधलें अन्न । मागूनि गेलों दुसऱ्यानें ॥ १८३ ॥

Transliteration

Jayaa ghareen vade-annu | Tetheela sad-bhakti aahe kaaminu | Tinoche prathama didhale annu | Maaguuni gelo dusaryaane ||

Ovee 184

तुमची इच्छा काम दावून । म्यां मागितले बडेअन्न । तंव ती बोलली मजकारण । गुरुभक्त म्हणविसी ॥ १८४ ॥

Transliteration

Tumachee ichchhaa kaama daavuunu | Myaa maagitale bade-annu | Tava tee bolalee maja-kaaranu | Guru-bhakta mhanavisee ||

Ovee 185

तरी तूं काढूनि देई डोळा । मग वडे देईन बाळा । ऐसे बोलतां तर्जनी बुबुळा । खोवूनियां काढिलें ॥ १८५ ॥

Transliteration

Taree too kaadhuuni daee dolaa | Maga vade daeena baalaa | Aise bolataa tarjanee bubulaa | Khovooniyaa kaadhile ||

Ovee 186

तरी हा अन्याय घालूनि पोटीं । मातें करावी कृपादृष्टी । ऐसें ऐकतां तपोजेठी । परम चित्तीं तोषला ॥ १८६ ॥

Transliteration

Taree haa anyaaya ghaaluuni potee | Maate karaavee kripaa-drishtee | Aise aikataa Tapojethee | Parama chittee toshalaa ||

Ovee 187

मग चक्षुरद्वाराहूनि वसन । हस्तें काढी मछिंद्रनंदन । तो रुधिरप्रवाह अति दारुण । चक्षुद्वारा येतसे ॥ १८७ ॥

Transliteration

Maga chakshura-dvaaraa-hooni vasanu | Hasten kaadhee Machchindra-nandanu | Toh rudhira-pravaaha ati daarunu | Chakshu-dvaaraa yetase ||

Ovee 188

मग बोले मच्छिंद्रनंदन त्यातें । बुबुळ कोठें सांग मातें । येरु काढूनि स्वहस्तें । गुरुनाथा दर्शवी ॥ १८८ ॥

Transliteration

Maga bole Machchindra-nandana tyaate | Bubula kothe saanga maate | Yeru kaadhuuni sva-hasten | Guru-Naathaa darshavee ||

Ovee 189

मग तो प्रतापी योगद्रुम । मंत्रसंजीवनी आराधोनि नेम । सवितातेज बुबुळधामी । मंत्रप्रयोगी स्थापिलें ॥ १८९ ॥

Transliteration

Maga toh prataapee Yoga-drumu | Mantra-sanjeevanee aaraadhoni nemu | Savitaa-teja bubula-dhaamee | Mantra-prayogee sthaapile ||

Ovee 190

पूर्णमंत्राचा होतां पाठ । बुबुळ संचरले चक्षुकपाट । मग पूर्वस्थितीहूनि अचाट । तेजालागीं मिरवलें ॥ १९० ॥

Transliteration

Poorna-mantraachaa hotaa paathu | Bubula sancharale chakshu-kapaatu | Maga poorva-sthitee-hooni achaatu | Tejaa-laagee miravale ||

Ovee 191

मग अंकीं येऊनि गोरक्षनाथ । स्वकरें मुख कुरवाळीत । म्हणे धन्य धन्य बा महिंत । तूंचि एक सच्छिष्य ॥ १९१ ॥

Transliteration

Maga ankee yeuuni Goraksha-Naathu | Sva-karen mukha kuravaaleetu | Mhane dhanya dhanya baa mahitu | Toonchi eka sachchishyu ||

Ovee 192

मग त्यासी घेऊनि अंकावरी । सच्छिष्यासह भोजन करी । परी धैर्यशक्तींची अपार लहरी । मच्छिंद्रदेहीं मिरवतसे ॥ १९२ ॥

Transliteration

Maga tyaasee gheuuni ankaa-varee | Sachchishyaa-saha bhojana karee | Paree dhairya-shakteenchi apaara laharee | Machchindra-deheen miravatase ||

Ovee 193

झालिया सांगोपांग भोजन । गोक्षरकासी बोले मच्छिंद्र जाण । बा रे तव भक्ति पाहून । परम चित्तीं संतोषलों ॥ १९३ ॥

Transliteration

Jhaaliyaa saango-paanga bhojanu | Goksharakaasee bole Machchindra jaanu | Baa re tava bhakti paahuunu | Parama chittee santoshalo ||

Ovee 194

तरी मजपासींचें विद्याधन । हृदयीं साठवीं ठेवून । मग अस्त्रविद्या दत्तात्रेयदेणे । सकळ तूते निरोपीन ॥ १९४ ॥

Transliteration

Taree maja-paaseenchen vidyaa-dhanu | Hrudayee saathavee thevuunu | Maga astra-vidyaa Dattaatreya-dene | Sakala toote niropinu ||

Ovee 195

कवित्वविद्या साबरी सबळ । तीही विद्या अर्पिली सकळ । एक मास करुनि वस्तीस्थळ । विद्येचा अभ्यास केला पैं ॥ १९५ ॥

Transliteration

Kavitva-vidyaa saabaree sabalu | Teehee vidyaa arpilee sakalu | Eka maasa karuni vasti-sthalu | Vidyechaa abhyaasa kelaa pai ||

Ovee 196

असो आतां निरुपण । पुढले अध्य़ायीं धुंडीनंदन । मालू सांगेल श्रोत्यांकारण । नरहरिप्रसादेंकरुनियां ॥ १९६ ॥

Transliteration

Aso aataa nirupanu | Pudhale adhyaayee Dhundee-nandanu | Maaluu saangel shrotayaa-kaaranu | Narahari-prasaaden-karuniyaa ||

Ovee 197

स्वस्ति श्रीभक्तिकथासार । स्मंत गोरक्षकाव्य किमयागार । सदा परिसोत भाविक चतुर । नवाध्याय गोड हा ॥ १९७ ॥

Transliteration

Swasti Shree-bhakti-kathaa-saaru | Samata Goraksha-kaavya kimayaagaaru | Sadaa parisota bhaavika chaturu | Navamadhyaaya goda haa ||

श्रीकृष्णार्पणमस्तु । श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु ।

Shri Krishnarpanamastu | Shri Dattatreyarpanamastu

इति श्रीनवनाथभक्तिसार नवमाध्याय संपूर्ण ।

Iti Shri Navnath Bhaktisar Navam Adhyaya Sampurnah